


म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2320

REFBK-0021901
REFBK-0021901

काव्य
सं ५९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

[कृ. मा. प.]

मुद्रक /
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
सदाशिव पेठ
पुणे ३०

प्रकाशक /
गोमंतक साहित्य
सेवक मंडळ
मेनेझिस् ब्रागांझ
इन्स्टिटयूट इमारत,
पणजी

© गोमंतक साहित्य
सेवक मंडळ,
पणजी

स्थापना / १९२८

पहिली आवृत्ती /
१९७६

मुखपृष्ठ /
सुभाष अवचट

मूल्य / पाच रुपये

या पुस्तकाचा
कागद
महाराष्ट्र राज्य
शिक्षणखात्याने
सवलतीच्या दरांत
उपलब्ध करून
दिला आहे.

वि. क्र. 2320

REFBK-0021901

शंकर वि. वैद्य
यांना....

*In literature, as in love, we are*
*astonished at what is chosen by others*

*—Andre' Maurois*

अनुक्रम


पंखपैल ९
घरटी १०
श्रद्धांजलीची कविता ११
स्वप्नाच्या कविता १३
नंतर १५
तलतच्या कविता १६
कुणी ? १८
मनातील हिमगंधी शिखरे १९
सावलीच्या कविता २०
खजुराहो २२
फोनशहर २३
काळोखकालीन २४
गोष्ट २७
पाऊस २८
संपल्याचे २९
सकाळकैफ ३०
आसमंत ३१
बेट ३२
कणाहीन आकाश सर्वत्र ३३
पावले ३५
संध्याकाळ ३७
पाखरे ३८
ख्रिसमस ४०
पाऊस ४२
काळोखगाज ४३
फाऽयर ४४
सूर्यास्त : दोन कविता ४५
अचानकतेच्या आत्मकेंद्री रानात ४७
काही काही दिवस ४७
दिवसांच्या बगळ्यांची ४८
काळोखासाठी कविता ४९
वस्ती ५१
सगळ्या संवेदनांनी ५२
तुमच्या सनातन चकव्यात ५३
ओसाड पावलांनी ५४
तो कुणीतरी ५५
दिशाहीन ५६
आकाश सर्वंकष असते ५७
छंद ५८
गाणे ५९
दफन ६०
दिवा काळोखाचा आत ६१
सैगल ६२
होतो उन्हाचा आरसा ६३
मोहेंजदारो ६४
तो ६५
कविता : एका घराच्या मृत्यूची ६६

## पूर्वप्रसिद्धी

सत्यकथा
प्रतिष्ठान
युगवाणी
मागोवा
अस्मितादर्श
वैखरी
शब्दकार
अश्वमेध
स्त्री
किर्लोस्कर
सह्याद्रि
वैशाली
अनुराधा

गोमन्तक
महाराष्ट्र टाईम्स
नवप्रभा
राष्ट्रमत
लोकसत्ता
लोकप्रभा
स्वराज्य
सकाळ
पाणंद
सलोखा

# पंखपैल

नरेन्द्र बोडके

# पंखपैल

झाडे आणि रस्ते आता संपलेत; इथपर्यंत दु:ख सोबत होते,
पावलेही कशी वाटांना भिनत गेली.
काळोख म्हणजे काय ? या प्रश्नाने सुरुवात केली
आणि इथे पोचलो. यापुढे तरी दिसेल
मातीला चिकटलेला सूर्य :
डोळ्यांत माझ्या पराभवांची पाने असलेले हे झाड
अगदी सोपे आहे. वेश्येच्या वासनांच्या ओळींसारखे—
की गुणगुणत रहाव्यात ओथंबून घरांच्या रांगा

घर म्हटले की आठवतो काळोख सणक भरेपर्यंत भिजलेला;
जो नेहमीच माझ्या डोळ्यांच्या बाहुल्यांतून परावर्तित व्हायचा
मग एकदा वाटांना बहाल केले आयुष्य आणि अनार्य झालो
आता कधी अत्यंत सोप्या प्रश्नांना डोळे देतो, ओठ तर अक्षरांना
दिलेत कधीचेच

अजून नाही कळाले काळोख म्हणजे काय, प्रकाश म्हणजेही.
आठवतात घरे ओथंबून आलेली, झाडांची पानेही
जड जड होत गळू येतात.
जिथून प्रवासाला सुरुवात केली तिथपर्यंत पाऊस;
पावसाचा आवाज सभोवार सर्वत्र वाजणारा....
की इतकं चालून तिथेच पोचलोय् जिथून सुरुवात केली
तिथेही नव्हती झाडे आणि वाटा संपत आल्या होत्या.
आठवणीत रुतून बसलाय्
कधी एकदाचा उजेड
आणि नुकतेच पंख फुटलेली एक मुंगी
त्याभोवती गोल गोल फिरणारी ...

## घरटी

कधीतरी ऐकलेल्या दु:खार्द्र गाण्यांनी
मनात खोल कुठेतरी घरटी बांधलेली असतात, अलगद
आपल्याला नकळतच.
कधीतरी जेव्हा होते एखादी जखम आतल्याआत,
सर्वस्व कापून काढणारी, तेव्हाही आपले मन
हळूच त्या लांबोडक्या गाण्यांच्या घरट्यात
सरपटत जाते व आत गच्च बसते निवाऱ्यासाठी
मुसळधार पावसाचा आवाज ऐकून एखाद्याने
पडक्या घराचा आधार घ्यावा, तसे.

तशी आपल्या दु:खांनीही बांधलेली असतात
आयुष्याच्या फांदीवर जागोजाग अशी लोंबकळणारी
व वाऱ्यावर हेलकावणारी घरटी;
दु:खे कधी जथ्याजथ्यांनी हिंडतात
पेटवून टाकत आपणच बांधलेली घरटी :
आपण दु:ख आहोत याचे दु:ख विसरण्यासाठी

आपणही नाही का घरटी बांधत
कुणाच्या तरी हृदयात ?
आपल्या अश्रूंचा अर्थ कुरवाळीत आपण नाही का
पराभवाच्या क्षणी आधार घेत असल्याच एखाद्या
घरट्याचा ?

एक मोठे झाड, त्यावर
घरटीच घरटी.
घरटी हेलकावताहेत वाऱ्यावर,
एक मोठे झाड : हृदयाच्या जवळच उगवलेले.

# श्रद्धांजलीची
# कविता

माझ्याच फोनवरून मी मलाच सांगताय श्रद्धांजलीचे एक भाषण
श्रद्धांजली : एका मेलेल्या घराच्या आत्म्याला, आठवणींच्या पडीक
देवळाला, मेंदीने रंगलेल्या काही दिवसांच्या पावलांना ....

मित्र हो,
दुःखाच्या दारूने श्रद्धांजलीची नशा चढल्यावर
मी एकच साधा प्रश्न आयुष्याला विचारला
घरे
उद्ध्वस्त का होतात ?
आयुष्य म्हणाले : घरे उद्ध्वस्त होत नसतात
उद्ध्वस्त होतो ते आपण. घराच्या नावाने.
उद्ध्वस्त होणाऱ्या सर्वांच्या दुःखाला श्रद्धांजली.

दुसरे असे की,
इतका प्रवास करूनही आपण शेवटी स्वतःलाच विचारतो
हा प्रवास कुणी केला, पावलांनी की रस्त्याने ?
पावले म्हणतात की रस्त्याने मध्येच फडा उगारून आपल्याला
दंश केला; रस्ता म्हणतो : कित्येकदा पावलेही
बहकतात, त्याचे काय ?
नंतर आपण निर्णय घेतो, हुकुम सोडतो :
सर्व पावले व रस्त्यांना फासावर चढवा.
फासावर गेलेल्या पावलांना श्रद्धांजली.

खरे म्हणजे,
हे घर मेले म्हणून दुःखानी दुखवटा पाळायला हवा
म्हणजे रक्ताचे निशाण करून शरणागतासारखे उंच
फडकवण्याची पाळी माझ्यावर आली नसती.
माझ्याच फोनवरून मी मलाच सांगतोय श्रद्धांजलीचे हे भाषण—
माझ्याच फोनवरून माझ्या मस्तकात भिनत चाललेय
श्रद्धांजलीचे काळेकभिन्न विष....

## स्वप्नांच्या
## कविता

१.

एकदा
मी स्वप्नात रात्र पुरली
निळ्या स्वप्नांच्या झाडाखाली
तेव्हा आयुष्य स्वप्नातच म्हणाले :
' हे काही खरे नव्हे
साऱ्या झाडातून आता रात्र उगवून येईल
आणि तुला डोळ्यात चंद्र पेटवावाच लागेल... '

२.

स्वप्नातच स्वप्न पडले मी स्वप्न पहात असल्याचे
स्वप्नालाच स्वप्न पडले आपण स्वप्न नसल्याचे

३.

स्वप्नाच्या स्पर्शाने तुझे सारे आयुष्य थरारले
हे स्वप्न तू मला का दिलेस ?
तू स्वप्न दिलेस
आणि स्वप्नांनी शाप दिला
: गाण्यांचा.

४.

समुद्र. मी. तू.
समुद्र. तू. मी.
समुद्र. स्वप्नासारखा. तरल.

५.

वाटा हरवल्यासारख्या वाटतात
तेव्हा वाटांनाच वाट विचारावी
नाहीतर स्वप्नांचे कोड फुटतात आयुष्याला.

६.

स्वप्नालाही तुझ्या देहाचा उन्मत्त वास येतो
की तूच स्वप्न होऊन येत असतेस; खरे सांग....

७.

स्वप्नाचे बोट पकडून
मी आयुष्यभर भरकटत गेलो....
हे मात्र स्वप्न नव्हते.

८.

स्वप्न झऱ्यासारखे वाहत राहते मनातून
स्वप्न दुःखाच्या काट्यासारखे सलत राहते
खूप खोल...आत

९.

स्वप्न
संपते तेव्हा
स्वप्नालाही वाईट वाटते.

१०

स्वप्नभरल्या डोळ्यांनीच
तुम्हा साऱ्यांचा निरोप घेईन म्हणतो
स्वप्नांच्या गलबतात बसून
अनोळखी समुद्रावर निघण्याआधी....

## नंतर

खवळलेल्या कुत्र्यासारखे आयुष्य भुंकून उठले माझ्यावर
कुणा दाढीवाल्या वेड्यासारखे कधी आयुष्य माझ्या दाराशी भीक मागत आले
सरळ सुतासारख्या रस्त्यांनाही अमानुष फाटे फुटले
तेव्हा साऱ्यांकडे पाठ फिरवून मी काळोखाला सामोरा गेलो, यात काय चुकले ?

चुकांच्या कंठात ठुमरीची तान घुमली
आणि मी मनातच घर बांधले अनेकवार तुटलेल्या स्वप्नांचे
रक्ताला दिलेल्या शपथांचा भाळावर टिळा रेखला
अश्रु फुलांसारखे गच्च डंवरून आले क्षणांवर
तरीही मी निरोपाचेच पक्षी दिसेल त्याच्या दिशेने सोडले

नंतर मी आयुष्यापासून खूप दूर गेलो ... खूप दूर
वादळाचा दिवा लागलेल्या समुद्रासारखा
नंतर मी माझेच प्रेत अश्रूंच्या शवागारात बेवारशी कुजत ठेवले ....

## तलतच्या
## कविता

१.

तलत,
तू गा.
तुझ्या गाण्याने
रक्ताचे बर्फ होऊ दे ...

२.

तुला माहित आहे,
इथल्या पानापानावर तुझी
प्रत्येक तान मी पेरून ठेवली आहे
कधी कधी तुझे स्वर मला चोहीकडून घेरून येतात
आणि मनाचा एक मोठ्ठा गुल्मोहर होतो
लालकेशरी स्वरांच्या फुलांचा.

३.

हट्टी मुलासारखे आयुष्य
प्रत्येक वळणावर हटून बसले
तेव्हा मी तुझ्या गाण्यांची शपथ घेऊन
वाटांना स्पर्श केला
नंतर मात्र गावामागून गावे
आली आणि गेली ....

४.

व्याकुळ संध्याकाळी दूर कुठेतरी
एखाद्या घरात दिवा लागावा
तसे तुझे गाणे.
अरे, या गाण्यासाठीच मी
आयुष्याची ज्योत लावली
या संध्येच्या दाराशी
आणि अस्ताच्या दिशेने निघून गेलो.

५.

माझी एकच इच्छा आहे
गाण्यातून उतरून कधीतरी तू मला कडकडून भेटावेस
माझ्या कवितेचा वाढदिवस
आपण साजरा करू....

## कुणी ?

कुणी हाक मारली का, मग ही साद कुठून आली
कुणी लावले आसवांचे झाड माझ्या दाराशी आणि ही व्यथा कुणी दिली ?

कुणाच्या पावलांचा हा आवाज येतोय खोलवर,
काळोखाच्या हृदयात सुद्धा
कोण घालतोय सावल्यांची शीळ ही अनावर....
मी काल नव्हतो, उद्या नसेन, आहे तो फक्त आज
हे कोण समजावून सांगतोय् मला मायेने मस्तकावरून हात फिरवीत ?

सगळें सगळे विसरतानासुद्धा काहीतरी राहतेच मागे
आपली ओळख दाखवीत
कोण राहते मागे ओळखीचा एक दिवा हातात घेऊन
कुणाच्या मनाचा हा गंध पसरून राहिलाय सर्वत्र सुवासिक....

# मनातील
# हिमगंधी
# शिखरे

मनातील हिमगंधी शिखरे;
थोडे थरकूपंज्याचे ऊन या सगळ्यावर
त्वचेचे कैफ शरीरापासून सरकत निवून गेलेले.

अजून आठवते इतकेच :
कुणासाठी तरी आलो इथपर्यंत
जे विसरलो त्याचा प्रत्येक सूर्यास्त
या अगम्य रंगांच्या ओळीतून काळोखसांद्र होत गेला.

मनातील हिमगंधी शिखरे
ह्या साऱ्यातून अचानक निमुळती होत जातात
सरत्या सावल्यांचे चौफेर फूल उलगडत जावो....
हिमगंधी शिखरे
थोडे थरकूपंज्याचे ऊन या सगळ्यावर या सगळ्यावर ....

## सावलीच्या कविता

१.

एक अतर्क्य सावली सरकत आहे तुमच्यावरून, माझ्यावरून
आपण सगळेच या सावलीचे बंदे गुलाम किंवा तिच्या
भासांशी संभोग घेणारे चालबाज, मित्रहो
नुसत्या उमाळ्यांच्या ओठांना झेपणार नाही असे
या सावलीच्या कैफाचे गाणे मला मिळाले आहे;
आयुष्याला आकाशाचा रंग चढताना एखादे वेळेस
दाट मायेचे हात सावल्यातून भडकलेल्या काळोखागत पसरलेले ....

२.

नशेच्या दिशांचे गुलाल उधळून संध्या;
तिचे भास मला एकदा वेढत वेढत आले
अशीच प्रकाशाची उत्सवगौर नगरे मी पाहिली होती
यापूर्वीही अशाच असीम डोळ्यांत, ज्यांनी मला
शाप दिला या दुर्दम्य गाण्यांचा आणि या सावल्या
माझ्यासाठी थांबल्या; मोडकळीस आलेल्या सर्व
श्रद्धांची शपथ घेऊन मी कुणाला साद घालतोय
तेव्हापासून ....

३.

गजबजून दु:खे आयुष्य उमलले, त्याचे पुण्य तेव्हापासून
जपतोय् : काठावर दिव्यांची वस्ती; पाणावलेल्या
लाटांची पावले फेसाळून सभोवार काळोख
ओल्या वासनांचा
तुझ्या लज्जेच्या सळसळत्या पानांची तीव्र झाडे हळुवारपंख
या सरकत्या सावल्यांच्या भासातून सरकतो आहोत आपण ...
भोवतालचा अतर्क्य प्रदेश मनभरून पहा
प्रत्येकाने स्वत:वरील सावलीबरोबर
सरकत राहिलेच पाहिजे हे लक्षात असावे ...

## खजुराहो

अंधाराचं घुंगरू फुटतंय् तुझ्या डोळ्यात
पियानो छेडत कित्येक संध्या गेल्या अशा मेंदीभरल्या पावलांनी
आपण पहिल्यांदा जवळ आलो तेव्हा
मोगरीच्या फुलांसारखं रक्त घमघमून यायचं
तशी तू अजून मध्यरात्रीच्या उदासीन पावसाच्या
सरी मनावर पेरीत येतेस कधी कधी
तरीही मी ढासळत चाललोय्
नवख्या कैद्यासारखा
दिवसांच्या या ढिगाऱ्यात.

अंधाराचं घुंगरू
फुटलंय् तुझ्या डोळ्यात आज कित्येक दिवसांनी
प्राण मोगरीच्या फुलांनी घमघमून;
आता रक्ताच्या फांदीफांदीला
तुझ्या श्वासांची भरती येऊ दे ....

## फोनशहर

या शहरात दु:ख मावळून रात्र उगवली
की मला फोन येतो : मी फोन उचलतो
शहर घोगऱ्या आवाजात बोलते. अपघातात
ठार झालेल्या कुणाचे तरी रक्त माझ्या कपाळावर
थबथबून येते ...

मी डोळे सूटकेसमध्ये भरतो आणि
शहराकडे जायला निघतो. जाताना अर्थातच
नेहमीप्रमाणे कुणालाही सांगितलेले नाही
नंतर रात्री येताना उशीर झाला म्हणून सरळ खोलीवर गेलो
खिडकी उघडली.
दूरवरून काळोखात घरांच्या एका झुपक्यातून
रडण्याचे आवाज कानावर येत आहेत
झोप येत नाही मुळीच. अख्खी रात्र आदबशीर
वेटरसारखी बाजूला उभी.
कधीतरी अचानक दार वाजते ....
काळी लुंगी चढवलेले उघडेबंब शहर
दाराशी उभे. त्याच्या हातात तातडीची तार :
" दु:खाच्या देखण्या राजपुत्राचे दु:खद
निधन झाले आहे. "

## काळोखकालीन

१.

मीच आहे नायक या प्रदीर्घ, काळोखकालीन शोकनाट्याचा
एखाद्या अत्यंत लांबवर पसरलेल्या बोगद्यासारख्या माझ्या या मनासकट
मीच माझ्याशी संवाद सुरू केला तेव्हा बालपण होते फुलपाखरासारखे
अवतीभंवती. तेव्हाच झाली सुरुवात या शोकनाट्याला.
मला कळले नव्हते की हे नेमके काय आहे; पण सारेच विचित्र दिसे मला
: सावल्या ढगांसारख्या तरंगून येत मनावर
कुणाच्याही डोळ्यात पाहताना मला त्यात काळोखाचे इवलेसे घर दिसे.
मग कधीतरी मीच मनाला सांगू लागलो वेगवेगळ्या कथा माझ्या
अस्तित्वाच्या, अगदी अभिनयासकट,
लोक म्हणू लागले की हा कवी आहे. हा जे बोलतो अगदी न समजणारे
त्यालाच कविता म्हणत असावेत.

२.

हे कवीचे घर. ही त्याची बायको. हा त्याचा फोटो.
कोपऱ्यात पाहू नका. तिथे एक आरसा आहे. त्यात चेहरा
पहाणाऱ्याला आपले हुबेहुब प्रतिबिंब दिसत नाही कधीच.
डोळ्यांच्या जागी घरे दिसतात आणि चेहऱ्याचा आकार
अष्टकोनी. अधिक पाहिले तर डोळ्यांतून घराचे दार उघडेल :
धुरासारखा पसरत काळोख बाहेर येईल
मग घुमतील तीव्र, आर्त हाका कुणीतरी काळोखाला मारलेल्या,
चेहऱ्याचे तरंगते शीड होईल आणि तुम्ही काळोखाकडे खेचले जाल.

३.

नाटक सुरू होते. स्टेजवर रात्र येते. गुडघ्यात डोके खुपसून रडत राहते.
नाटक सुरू होते तिथेच संपण्याची सुरुवात झालेली असते. मग
खरोखरच काय सुरू होत असते व संपते तेही काय ? संपण्याची
सुरुवात होतानाही आणखी काहीतरी न संपण्याला प्रारंभ होतो काय ?
नाटक बरेच कठीण आहे.
रात्र जाते, तरीही स्टेजवर कुणीतरी आहेच. स्टेजवर हाका
उभ्या आहेत, त्याने काळोखाला मारलेल्या हाका.
प्रत्येक हाकेला एक वेगळा देह.
हाकाच हाका मारतात स्वतःला. नकळतच. आणि पडदा पडतो.

४.

तो बघतोय या साऱ्याकडे, एका प्रदीर्घ काळोखकालीन
शोकनाट्याची सुरुवात व शेवट तो पहातोय. तो ऐकतोय नायकाचे
स्वगत, त्याच्या कविताही, मग तो सावकाश कवीच्या घरी जातो.
मुद्दामच कोपऱ्यात पहातो. आरशात डोकावतो, त्याला दिसतात स्पष्ट
आपल्या डोळ्यांची दोन घरे
आणि प्रत्येकाचे दार हळू हळू उघडणारे...

५.

काळोख जेव्हा जन्मला तेव्हाच हे नाटकही जन्मले.
मी खरेच नायक आहे हो या प्रदीर्घ नाट्याचा किंवा
तुम्हीही त्याचे नायक आहात असे तुम्हाला
वाटते तेव्हा तुम्ही नुसते ते पहात असता स्वत:ला विसरून.
नाटक सुरू होते तेव्हा त्यात मी असतो, संपते तेव्हा
त्यात तुम्ही असता.
आता असे करा : या काळोखाला नमस्कार करा कारण
तो कधीही संपत नाही.
जे संपत नाही ते सुरूही झालेले नसते.
काळोखाला नमस्कार करा :
त्याच्या न संपण्याचेच हे प्रदीर्घ शोकनाट्य आहे
आणि मी नायक.

## गोष्ट

मी ढासळत जातोय् बुंध्यातून पावलांच्या भिंतीच
खचू लागल्यावर;
एक मी :
सकाळी उठतो, ऑफिसला जातो, बातम्यांची रूक्ष
भाषांतरे करतो. ऑफिसची वेळ संपली की घरी येतो.
दुसरा मी :
पगारातून आभाळ विकत घेण्याचे स्वप्न पहात
तिच्यात विरघळतो.
तिसरा मी :
कोठारातून एक एक दाणा नेणाऱ्या चिमण्यांची गोष्ट
एक चिमणी आली एक दाणा घेऊन गेली. दुसरी
चिमणी आली .... वगैरे

दाणे कधीतरी संपणारच; गोष्टही संपली पाहिजे.
मी काय आहे ? दाणा, चिमणी की कोठार ?
की मी ती गोष्टच आहे आणि गोष्टी संपतातच
जशा आता माझ्यासमोरील साऱ्या वाटा संपल्यात.
या संपलेपणाचीच झाडे.
नुस्ते यातल्या एका झाडाचे पान व्हावे,
राहिलेल्या पानांना चिमण्यांची गोष्ट सांगावी
व म्हणावे—गोष्टी संपतात हो .... संपतातच.

## पाऊस

मनातल्या मनात विझून गेलेल्या गाण्यांचा एक भलामोठा
पाऊस येतो कधीतरी अचानक
पाऊस घराच्या छपरावर वाजतो, दारातून डोकावतो.
पाऊस येतो आणि घराला नकळतच एक गाणे सुचत जाते
मनातल्या मनात

कधीकधी असे होते : पाऊस येतो तेव्हा आपण घरी नसतो
मग कुणीतरी हलकेच सावल्यांची हाक घालते मातीच्या ओल्या वासाला
कुणीतरी घरातला एक एक दिवा विझवत जाते
कुणीतरी येऊन अलगद घराचे दार बंद करते

पाऊस हलक्या पावलांनी परततो
मनातल्या मनात विझून गेलेल्या गाण्यांचा भलामोठा पाऊस
कधीतरी;
अचानक...

## संपल्याचे

सुखाचे ऋतू संपल्याचे जाहीर झाले तेव्हा
समोरच्या खिडकीतून दिसणाऱ्या तारांवरच्या पक्ष्यांनी
शेवटची पंखझडून गाणी गाऊन घेतली

मी उठलो आणि सरत्या पावलांनिशी चालत राहिलो
तसा हुकूम त्या जाहिरनाम्यात समाविष्ट आहे.

सुखाचे ऋतू संपल्याचे जाहीर झाले तेव्हा
मध्यमवर्गियांच्या गांजलेपणासारखे चिकट ऊन
पसरत आले रक्तापर्यंत
सगळ्या जखमांना हात फुटले असहाय्य आक्रोशांचे
माझ्याच मावळतीला शरण जाण्याच्या तयारीने
मी सगळी धुगधुगती हाडे विझवली;
उठलो नि सरत्या पावलांनिशी चालत राहिलो
तसाही हुकूम त्या जाहिरनाम्यात समाविष्ट आहे.

## सकाळकैफ

नुसती सकाळ भरभरून घरांच्या कौलांवर कोसळते
ऊन, आभाळ समेवर आल्यागत उत्कटतेला पोचताना
प्रकाश आवेगभऱ्या एखाद्या गाण्यात विरघळत जातो
गाणे : नुसते एखादे साधेसुधे गाणे जीव ओतून गायलेले
स्वरांची एकसंध आर्तता; प्राण दाटत आलेले ...
गाणे सकाळ कवळी असतानाच जिव्हारी भिडते
एरवी मृत वाटणाऱ्या वाटांची नवलाई :
शब्द नको, नको संकेत आणि काहीही. नुसते
सकाळच्या पाराला लावण्य व्हावे ...
कुणाचे आर्त अनोळखीपण घेऊन सकाळ येते
घरांच्या कौलांवर भरभरून गाण्यांची धून

> "अरे, ही सकाळ माझे डोळे झालीय् ;
> डोळ्यांच्या पार क्षितिजापर्यंत प्रकाश नुसता अनावर होऊन दरवळणारा
> अरे, हा देह तुला दिला
> तेव्हा माझी मीच संपूर्ण सर्वस्वासगट अशीच
> सकाळ झाल्ये होते; तुला आठवतं का ?"

सकाळ ह्या साऱ्यासकट दाटो
मनांची फुलझड क्षणांच्या आवर्तनातून
सकाळत जाते विस्मयात

कुणाचे हे जाच ? आवर्तने सैल होत आलेली
कुठे वाटा सकाळच सर्वत्र आवेग प्यालेली
पुन्हा गाणं 'इक प्यार का नगमा' पुन्हा समुद्र त्या गाण्यातला
प्रत्येक देह वासनांची सकाळ होत विरघळून जावो
आयुष्य दाटत क्षणांना बिलगत आलेला
सकाळकैफ दिगंत....

## आसमंत

दुरून दिव्याचा भास होतोय्
ते नक्की काय आहे
या नाठाळ रस्त्याने मला घातलेली शपथ
की रात्रीच्या डोळ्यातील काळोखाचे पाणी...
दुःखे इतकी समंजस की त्यांनी
प्रत्येक वेळी आपल्या आगमनाची
पूर्वसूचना दिली
मग मी एक मंदिर बांधले
आधीच्या सर्व अश्रूंना स्मारक म्हणून;
शिशिराची कृपा व्हावी
तसा हा हुंदक्यांचा उग्र वास
सर्व आसमंत भरून राहिलाय्
आणि शेवटच्या क्षणी वाहण्यासाठी
पावलांचे हे सर्वव्यापी फुल घेऊन मी तयारीत आहे
आता ही नुसती घनदाट रक्तप्रतीक्षा
त्यावर आयुष्याचा एकमेव उदास पक्षी...

## बेट

अनिवार सुन्नतेचे गर्द बेट
मनातून उगवून येतेय्
अचानकच हे सारे घडून येते किंवा अंधार,
बेढब म्हाताऱ्याच्या खोकण्यासारखे आवाज काढते खोलवरून

आता फक्त मी,
ही अविरत पानगळ
आणि वादळांच्या घोंगावण्याचे आवाज
एवढेच ह्या बेटावरील रहिवासी
तुमचेही गलबत फुटलेय् ना असेच अचानक ?
तर इथे आसऱ्याला येऊ नका
हे
बेट
निर्घृण खुन्यासारखे माझ्यावर वाकलेय्
फार काळ जपून ठेवलेला आघात करण्यासाठी.

**कणाहीन**
**आकाश**
**सर्वत्र**

रक्त उगाळीत सूर्य उगवतात मावळतात इथे
कणाहीन आकाश सर्वत्र. पहारा पांघरून साठून येतात
चैतन्याचे आभास
खेकड्यांचे राठ पाय उगवून हे असे काळोख;
मातीच्या खोल बुंध्यात झिरपत जाणारे माझे डोळे
किती सांगाड्यांचा सर्ववाही विळखा रंगाच्या फाकत
जाणाऱ्या आतड्यांपर्यंत रुतत जाईल...

कणाहीन आकाश सर्वत्र; पहारा पांघरून झाडे आंधळ्या
पानांनी माखलेली गाताहेत उद्ध्वस्तता : इथल्या
देहांच्या देठातून आवळत आलेली
टेलिप्रिंटरमधून सरकणाऱ्या बातम्यांचे ओठ गातात
उद्ध्वस्तता. कैरो, ता. ५ ( यूएनआय ) च्या
रूटीन यमकांची उद्ध्वस्तता
सभोवार शहर :
इमारतींच्या डोळ्यातून बेवारशी डोकावणारे
सभोवार शहर
या गस्त असलेल्या रस्त्यांच्या फासेपारधीत सापडलेले
किती पावले वळतात इथून भोवती गतीचे
आक्रोश खुपसून घेतलेली किती पावले फेसाळत दररोज
ठराविक वेळी कचेऱ्यांतून गर्दी करतात.
आयुष्य पुसले जात आहे झोपड्यांच्या जटा विस्कटून
सभोवार माणसे शरीरभर कुणासाठी ओसंडून चाललेली...

कणाहीन आकाश सर्वत्र;
पहारा पांघरून मातीच्या खोल बुंध्यात झिरपत जाणारे
माझे डोळे
किती सांगाड्यांचा सर्ववाही विळखा
रंगाच्या फाकत जाणाऱ्या आतड्यांपर्यंत रुतत जाईल....

हे असे उगवतच रहाणार आहेत
मूळव्याध लागलेले माणसांचे संभोग
ही अशी घोंगावत येणारच जबडा वासलेली गाज
ह्या रस्त्याशहरातून
कणाहीन आकाश सर्वत्र पहारा देणारे;
आकांतांचे काठ किती अंतहीन वाटतात...

# पावले

घोळ्याच्या किंचित पुढे
पावलांचे पसरते आकार. कुणी म्हणतात पावलांना अर्थ नसतो
अर्थाच्या गहिऱ्या भाषेत बोलतात ते फक्त
रस्त्यांच्या कडेशी ठोकलेले मैलांचे दगड
आणि दिशादर्शक पाट्या.
पावलांना अर्थ नसतो
अर्थ नसतो वाहत्या पावलांच्या गतिमानतेत बुडालेल्या
निमुळत्या इमारतींच्या शहरांना
असे आहे,
की आपणच आखून घेत असतो आपले रस्ते
नीट विचार न करताच.
एखाद्या हॉस्पिटलमध्ये रेंगाळणाऱ्या
औषधांच्या उग्र दर्पाप्रमाणे
कुठेही भिनत जाण्याइतके खचितच सोपे नसतात
आपले रस्ते
अथवा नसतातही इतके अर्थगंभीर
जसे एका इंग्लिश कवीला खिडकीतून दिसणाऱ्या
रस्त्यांबद्दल वाटायचे.
असंख्य असंबद्ध पावलांची अशी नुसती तंगडेतोड
चालू असते.

एकदाच पहावं कुणीही स्वतःच्या पावलांकडे—
भडभडून येईल इतकी भाबडी तरीही
तुम्हाला आवडणाऱ्या कुठल्याही गाण्याचा ठेका धरणारी

सर्वदूर घोंगावत येणारे रितेपणाचे खच
दाटून राहतात कधी आपल्या सभोवार
तुटून जातात पावलं देहापासून
अशा प्रवासाच्या नादात हरपलेल्या कबंधांना चुकवून
जिथे सगळ्याच रस्त्यांचे इमान
संपलेले
असते.

# संध्याकाळ

संध्याकाळ :
रस्त्यांना फुटलेल्या
असंख्य माणसांच्या देठांना
नशा फुलून येते; थुईथुई तंद्री ....

आकाश, जे आपण नेहमीच पहातो
विलक्षण जवळचे वाटू लागते अशा वेळी
खोल पोखरत जाणारे रंगविलक्षण आकाश
संध्याकाळ : रस्त्यांना फुटलेल्या
असंख्य माणसांच्या देठांना डोळे फुलून येतात
सर्वस्व लुटून एका फुटपाथवरील म्हातारीचे
कचऱ्याची गाडी निघाली :
तिचे डोळे ...

झपाटून सगळी गर्दता झाडातून काळोख
दाटत आला आवेगसांद्र ओसाडीचे गाणे
संध्याकाळ
नुस्ती अशीच
इगर्जीच्या अंधारात गुरफटणाऱ्या
वासनांनिशी
विलक्षण पंजे आवळते माझ्याभोवती.
मी : रात्री पिऊन, प्रकाश पिऊन
नशेच्या तांड्यात दिशाहीन
त्वचेच्या किनाऱ्याला लागलोय् कधीचाच

संध्याकाळ; थुईथुई ...

## पाखरे

जिथे वेदना संपते
आणि सुरू होतो प्रदेश एका अनिवार्य अटळतेचा
तिथे नेणारे गाणे कुठे आहे ?
        काळोख पेटवून वासनांतून
झाडांचे उंच हिरवे शाप मला
मातीला शोषणारे सर्वत्र थिटेपणाचे ऊन;
कुठे आहे गाणे ?
माझ्या साध्यासुध्या नगण्य आयुष्याचे
असंख्य आक्रोश शब्द सैराट
असा मी जसे की उंच निळे आभाळ वरमोकळे
भोवती हा लाटांचा थकव्यांनी वेढणारा समुद्र,
जिथे वेदना संपते.
नवीनच जोमाने माझी उद्ध्वस्तता उगवू लागलेली
कशाने मी असा उद्ध्वस्त ?
इतके सगळे हात माझा गळा घोटायला सज्ज असलेले
कुठलाही क्षण येईल उद्रेक घेऊन—
        हा उद्रेकही अटळ
माझ्या उद्ध्वस्ततेची नांदी प्रथम गायिली
ती माझ्या लाडक्या पाखरांनी
मागून हे निल्य आतून पोखरणे आले
कितीदा मी गाणी गायिली त्यांच्यासाठी, कितीदा
कितीदा मी मरून गेलो समुद्राच्या लाटांचा शीण होत;
प्रत्येक वेळी हे सगळे सहज संपते
सभोवारचा विसर पडून
नंतर पुन्हा मातीला शोषणारे थिटेपणाचे ऊन
सर्वत्र पसरते.

तुमच्या, माझ्या उद्ध्वस्ततेची शिसारी आणि
तिचा उद्दाम आवेश

जिथे वेद्‌ना संपते
आणि सुरू होतो प्रदेश
                एका अनिवार्य अटळतेचा
तिथेच नेमकी सुरुवातीची सगळी पाखरे
कंठापर्यंत पुरलेली—गात असतात
शेवटची कंठशोष कोरड
माझ्या उद्ध्वस्ततेची
पाखरा; गा ऽऽऽ

## ख्रिसमस

आत्ता या घडीला मी प्रचंड अस्वस्थ आहे
इतका अस्वस्थ की
चिक्कार, हंडाभर दारू प्यावी, कोसभर लांब
सिगरेटच्या धुराचे कल्लोळ झुरकून घ्यावेत
किंवा सडकून हाणामारी करावी असे वाटू लागलेय
मी चिक्कार अस्वस्थ आहे या घडीला
यापुढे इथे प्रत्येकजण माझ्या दुःखाचे ख्रिसमस
साजरे करील.
मी पेटवून दिलीय माझ्या दुःखाची ज्योत
इथल्या प्रत्येक डोळ्यात;
ख्रिसमसच्या रात्रीचे शिस्तबद्ध कॅरलसिंगिंग.
माझ्या सगळ्या सुन्या रात्री
ह्या गाण्याच्या ओळींचा सूर धरून हातात
दिवे घेऊन निघाल्यात.
माझ्या दुःखाचे ख्रिसमस; इथल्या
समुद्राची एकेक लाट या कॅरलसिंगिंगमध्ये
भाग घेत या पेटत्या रांगेत येईल....

सूत्र एवढेच :
जे जातात आपल्याआधी त्यांच्यासाठी
गाणे गावे; ह्या गाण्याच्या हातात दिवा असावा
अथवा प्रत्येक ओळच पेटलेली.

साऱ्यांच्या रक्तवाहिन्यांतून मी
माझ्या अस्वस्थपणासकट असा वाहतोय
ज्यांचे रक्त अद्याप पेटले नाही त्यांनी
सावल्यांच्या जाणिवांना स्पर्श करावेत
विझल्या रक्ताच्या माणसांना
इथे मज्जाव आहे.

आकाश पेटेलही कदाचित
किंवा ओसरतील ही सारी वादळे;
माझ्या दु:खाचे खिरसमस
तुमच्या रक्तातून साजरे होवोत
मी चौखूर उधळलोय
तुमच्यातून सर्वस्व बहरून आलोय....

## पाऊस

आता रस्त्यावर खोल कळांची गाणी
विजेच्या खांबांनजीकच्या अंधारात रेंगाळताहेत
हा रस्ता : तू गेल्यापासून प्रत्येक कोनातून
माझ्या सावल्या शोषून घेणारा
गाण्यातल्या खोल कळांचा रस्ता....

आज भिजलीय पूर्ण असलेली आयुष्याची प्रत्येक ओळ
अचानक गारवा
ह्या सावल्यांच्या आत कुठेतरी पाऊस
पडत असावा कदाचित
पाऊस उगवत जाईल जसजसा रक्तापर्यंत
सोसेन हिमगंधी थरांचे ओझे
निदान तुझ्या बाहुल्यांच्या आडची तरी
उब भिजू नये म्हणून : पानातून पाऊस
प्रत्येक झाड एक गारव्याचं गाणं
नजिकच्या अंधारात....

## काळोखगाज

काळोखगाज भरून आलीय् माझ्या शब्दातून आताच
आणि कुठल्यातरी गाण्याची नस पकडून वाहणारा काळोख
पावलांवर पावले रचून ठेवावी तशी सावल्यांची रास जडावलेल्या डोळ्यांवर

सावल्यांनी घेरून आलेला
हा रात्रीपुरता गळाबंद समुद्र विस्तारत राहील रस्त्यांच्या अंतापर्यंत

जितकी गाणी तितके रस्ते,
विस्तारत राहील गाण्यांच्या अंतापर्यंत. हा काळोख खरा
जेव्हा रस्त्यावरील पावलेही खरी असतील. काळोखगाज
वाहत येते गर्भातून दिवसाची झड सुन्न संपताना....

## फाऽयर

दूरवरून बुडत्या पायाची हाक
हिनकळत येणारी
मनाच्या भिंती वादळ चिकटल्यागत
सळसळतात.
संगिनी रोखून हल्ल्याच्या तयारीने
सज्ज सरपटणारे दिवस
जवळ येऊन ठेपलेत
अद्याप कसे सारेच आपापल्या तंबूत
वि सा व ले ले
काळोख पेटवून द्या जवळपास असलेल्या
मशालींनी
दूरवरून सावधानतेची हाक आलीय
फाऽयर ....

## सूर्यास्त : दोन कविता

१.

ह्या नवीन सूर्यास्ताचा
तुम्हाला नमस्कार असो
साऱ्या घाऊक आणि किरकोळ
व्यापाऱ्यांच्या रक्ताचे गजरे
दिशांच्या गात्रातून उमटताहेत
शनकार्डावर यापुढे
वादळेही देण्यात येतील
अशी जाहिरात देणारा एक सरकारी
अधिकारी
काल झालेल्या सामुदायिक रेपिंगच्या वेळी
ऐन उमेदीत होता;
मला नक्की आठवतेय्...

२.

मरणाच्या
काळ्या कडेशी
ह्या सूर्याचा अस्त झाला.
हा अस्त ज्याने लिहिला त्याचाही
नंतर अस्त झाला.
मित्रांनो,
खिडक्या उघडून खोलवर
काळोखात बघा.
दूरवर हात उंचावलेला
दिसतोय्
तो सूर्य कुणाचा आहे?

**अचानकतेच्या**
**आत्मकेंद्री**
**रानात**

अचानकतेच्या आत्मकेंद्री रानात
झाडांच्या फांद्याफांद्यांतून पसरून पानांतून आवर्त उठावं
तशी आज तू दिसलीस अचानक.
तुझ्यासाठी एखादी तरी कविता हवी म्हणून
शब्द बरोबर नसूनही आज
दूरच्या वाटांवर भटकलो.
शब्दांच्या नसांतून वाहणाऱ्या पर्वणीचा
संदर्भ हरवला म्हणजे मी असाच भटकतो दूरवर....

अचानकतेच्या आत्मकेंद्री रानात
तुझ्या अभुक्त देहाची मी मागितलेली भीक
अशी कधीकधी फुलझड होते
दूरवर अक्षरांच्या किनाऱ्यावर फेसाळताना
तुझ्यासाठीच असलेली माझी कविता
आयुष्याएवढी होऊन येते....

## काही
## काही
## दिवस
## उगीचच

### १

पाऊस पडून प्राण डहुळून आल्यावर
जाणवतो एखादा मागचा अनावर दिवस
        बगळ्यांच्या पंखावर आठवणी झुळ्ळ झुळ्ळ आल्याचा
        डोळ्याकाठची राने काळोखाच्या गुडूप तंद्रीत बुडून गेल्याचा
पाऊस पडूनही ओळखीच्या फांद्यांना भिडलेली पानझड....

### २

हिरव्या पानांचे अनावर दिवस अनोळखी होत जाताना
पुळणीवरच्या सुकतीच्या शपथांसारखे
डोळ्यांचे डोह चंद्रझुरे
पाऊस पडून प्राण डहुळून आल्यावर रिमझिम
गाण्यांच्या सरीसरी
गंधबेछुट अनावर दिवसांवर....
काही काही दिवस
उगीचच अनोळखी वाटतात....

## दिवसांच्या बगळयांची

दिवसांच्या बगळयांची शेवटची रांग मावळत जाते
डोहतुडुंब गाण्यांच्या आरपार;
आयुष्याच्या जुगारी समीकरणांची काळोखझड ....

दिवसांच्या बगळयांची शेवटची रांग मावळत जाते
समुद्रसुन्न डोळे कधीचे ओसाड
जागोजाग आता नसांतून सुख फेसाळून नेणारे आकाशडंख ....

## काळोखासाठी
## कविता

१.

स्मशानाजवळ वितळत चाललेल्या चेहऱ्यांची गर्दी
इतक्या मध्यरात्री चितेवर चढविण्यासाठी
वाहून आणलेले काळोखाचे बेवारशी शव.
इतकी गर्दी
पावले झडून जाईपर्यंत चालत जाताना; कवितेच्या
काठाशी बुरशीसारखी साचत गेली.

२.

कधी आला सरकत काळोख माझ्या आयुष्यात, ठाऊक नाही
सभोवार दाटून येतो रक्तातून रुजत पडलेला काळोख
जेव्हा तो फळेल तेव्हा माझ्या आयुष्याचे एक इमान
शिल्पित होऊन जाईल.
किती जन्मात विभागून पडेल अशा आयुष्याचे कबंध,
मला सांगता यायचे नाही.

३.

तिच्यासाठी राखून ठेवलेला डोळेभरून काळोख
उलगडत जातो. अशा देहाच्या काठाशी झिजत
जाणाऱ्या रात्री; कुणासाठी म्हणून शोक करावा ?
हातावरच्या सगळ्या रेषा
पक्षी होऊन दूरपर्यंत फाकल्यात...

४.

माझे पुण्य इतके होते
निदान प्रेताला खांदा द्यायला कुणी पुढे सरसावतेय्
इतकी गर्दी;
चेहरे वितळत चाललेत तरीही जमलीय्
जाताना साचत जाईन किमान ह्या शब्दातून—
" लोक हो,
झुगारून द्या
आपापल्या बाहुल्यांमधले काळोख
कुणीतरी सूर्य शोधीत येताहेत. "

५.

देहभर
काळोख;
उभे आयुष्य
कुणासाठी ?

## वस्ती

दचकलेपणाचे गच्च पीक तरंगून येते
मनावर
भरकन् एक मोटार हॉर्न वाजवीत
शेजारून गेली तेव्हा
भूतकाळ कधीच ओव्हरटेक करून गेलाय्....
समोर दाट दिव्यांच्या काठाची वस्ती
अधिकाधिक खोलपर्यंत बुबुळांना
भिनत जातेय्...

मराठी ग्रंथ संग्रहालय
2320 काव्य

## सगळ्या संवेदनांनी

सगळ्या संवेदनांनी पाठ फिरवली आकाश
पावलांना विसरले गेले म्हणून
या गर्दीतून, माझ्या भोवतीच्या गराड्यातून
मला दूर व्हायचेय्. एकाकीपणाचा
खंजिर मी पाठीत खुपसून घेतलाय् त्याचसाठी
तर .... मी निघालोय्; माझ्या दुःखांची दवंडी
पिटणारे माझे शब्द माझ्या आधीपासूनच सज्ज
आहेत.

आपण एकमेकांना फसवू शकणार नाही.
तुमच्या डोळ्यांच्या काचांवर क्षणांचे रंग दाटून येतात
तुमच्या आयुष्याचे मोजमाप
क्षणांनीच केले जाते. मला माहिताय्.
माझ्या जाण्याने तुमच्या शोकांना महापूर येणार नाहीत
माझेही तसेच आहे : सगळ्या सरमिसळ
गुंतावळ्याची झाडे मेंदूवर विचित्रतेने उगवलेली.
जाता जाता :

> " किनाऱ्यावरच्या असंख्य माणसांनो,
> त्याला निरोप द्या कारण त्याला किनारे नाहीत.
> त्याला निरोप द्या कारण त्याच्या गाण्यांनी
> तुम्ही कधीतरी दिशाहीन होणे
> त्यावरच अवलंबून आहे. "

तुमच्या
सनातन
चकऱ्यात

त्याच तुमच्या सनातन चकऱ्यात सापडलोय मी संपूर्ण एकाकी
सभोवार सर्व काही असून नसलेले. पुसट आयुष्य;
अंधुक क्षण सगळेच. सगळ्याच दबलेल्या दिवसांना
नुसतेच दुःख गाण्यासाठी ओठ फुटलेले
येताना काही वाटांवर झाडेही गर्दीच्या गाण्याची
लकेर ओथंबून शहारत होती
येताना पंख पेटून प्रारब्ध क्षितिजपार झेपावलेले ....

त्याच तुमच्या सनातन चकऱ्यात सापडलोय् मी
संपूर्ण आयुष्यासकट; माहिताय् की यातून सुटका नाही
माहिताय् हाच तो किनारा, मैलोगणती समुद्र पार करून मिळणारा
विसरायलाच हवेत आता मनातून खोल माजलेले आक्रोश;
हे सगळे भास आहेत का ?
निदान ठरोत भासवत् जुने सगळेच भाग
चित्रविचित्र चेहऱ्यांच्या ओळींनी घेरून येणारे प्रारब्ध हे
गाण्यांची एक सरळ रेषा माझ्या डोळ्यादेखत विलयाला भिडतेय्.

## ओसाड पावलांनी

ओसाड पावलांनी वृक्षांच्या फांद्यांतून पाझरताना सांज निवळते रक्तातून
निष्पर्ण सावल्यांचे गाव मातीची शपथ घेऊन घनदाट घोंगावते
डोळ्यांना संपण्याचे कल्लोळ असतात तेव्हा
सवयीच्या लाटांनाही वर्ज्य झालेले झुगारलेपण; सांज जशी निवळते
रक्तातून अधिकाधिक तीव्रतेने दुःख ठिबकते. वासनांना
आसरा देणारे प्रत्येक घर सलगतेने उजाड होते अपरिहार्यपणे
उद्ध्वस्त क्षणांची एक प्रचंड रांग फाटक ठोठावतेय....

# तो
# कुणीतरी

तो कुणीतरी मागून येतोय, त्याची छाया
झपाटलेपणाचे रस्त्यांना कंगोरे
उगवलेत
मी हल्ली बोथट होत चाललोय का
की हे दुःख बोथट, काही समजत नाही
जवळ येणाऱ्या मोटारींचे भीषण दिवे
मेंदूवर साचून येतात
जशी संध्याकाळ जळतेय आता
अघोरी आठवणी काळोखात बुडत जाताना...

## दिशाहीन

खोल समुद्रात बेपत्ता असलेल्या माझ्या आयुष्याच्या शोधात
मी भटकतोय् या किनाऱ्यावर कधीपासून;
या आयुष्याबरोबरच माझे नाव आणि पावलेही हरवलीत
जुन्या आठवणींपैकी मागे उरलाय् तो हा थोडासा काळोख
आणि पैंजणाच्या नादासारख्या झंकारल्या पावसाचे चिंब गाव....

या साऱ्याला संदर्भ आहे तो एका अगम्य वादळाचा,
त्यातच आयुष्य वाहून गेले. त्यानंतर आता अचानक रात्री–अपरात्री
रक्तावर घनघोर वादळे घोंगावत येतात.
शरण जाण्याच्या तयारीने
पेरून ठेवलेल्या प्रार्थनांना
झाडे उगवतात अस्ताव्यस्त गर्दतेची
आता सावल्यांना प्राण फुटेतो
हा किनारा मला सोडता येणार नाही....

## आकाश सर्वंकष असते

आकाशाच्या शोधात जाणाऱ्यांना
सर्वस्व गमवावे लागते
त्यांना हात नसतात; हात नसले की
देणाऱ्यांनाही अनंत होता येते
असाच आकाशाचा टिळा लावला, आयुष्य बुडतानाही
गाफिल राहिलो : सभोवार आक्रोशांची अरण्ये;
आता रक्तातून काळोख पसरत येतो, संथ आणि अमानुष
झाडांचे लख्ख आकार,
अंधारात प्राणावर पसरत येणारे
प्रार्थनांच्या घोषाचे चर्च;
सगळेच रस्ते हळूहळू दुरावत जाणारे
आकाश सर्वंकष असते
आणि जाणिवांच्या किनाऱ्यांना अंत नसतो...

## छंद्

उगिच हा भलत्या दिशांचा छंद आतुन लागतो
उगिच हा पक्षी उद्याचा आज अश्रू गाळतो

गोठल्या चंद्राहुनी ही खोल रक्ताची मुळे
अक्षरांच्या पौर्णिमेचा चंद्र मी कुरवाळतो

उतरले काठी मनाच्या आसवांचे हे थवे
कोण त्यांच्या चाहुलीला प्राणही ओवाळतो

गंध दिवसांचे पसरता, बहरता दाही दिशा
फूल तेव्हा सावल्यांचे कोण भाळी ढाळतो...

लाट ही येते नि जाते गाज का सर्वत्र ही
का तमाच्या बासरीचा सूरही थर्‌कापतो....

## गाणे

एक गाणे माझ्या दाराशी घोटाळतेय् कधीपासून
मी दार उघडतो

अस्पर्श वितळत्या उन्हाचे घर वाहत
आत येते

मी गाण्याच्या डोळ्यात पहातो
' अरे,
माझेच हे डोळे,
साऱ्यातून नाकारला गेलो
तेव्हा मीही असाच दारोदार भटकत होतो
आज गाणे माझ्या दाराशी "
॥ दाराशी आलेल्या गाण्याला कधी हाकलून लावू नये ॥
॥ घर विसरून जाऊ नये ॥

# दफन

ही गोष्ट आहे एका संध्याकाळची
त्या संध्याकाळी आम्ही एकाच्या अंत्ययात्रेला जाऊन आलो
सर्वांनीच पाहिले, कुणा एकाचे दफन होताना
इथून खूपच दूर असलेल्या एका स्मशानात

मग सारेच इथे आलो.
इथे, या समुद्रकिनाऱ्यावर.
तशी ही गोष्ट कुणा एकाच्या अंत्ययात्रेची नव्हे
हे त्या गोष्टीनेही आम्हाला इथेच सांगितले
नंतर नेहमीप्रमाणे सूर्य मावळला
आम्ही त्या गोष्टीतलेच असल्याप्रमाणे
अजूनही हरवल्यागत झालो होतो
नंतर गोष्टीने आम्हाला आपलीही गोष्ट सांगितली
समुद्रही कुणाचे तरी दफन पाहिल्यासारखा
शहारला : ही एका संध्याकाळची गोष्ट....

दिवा
काळोखाचा
आत

दिवा काळोखाचा आत; त्याने पेटलो पेटलो
नग्न आकाशाचा देह, त्याला खरेच भेटलो ....

ओस शिशिराचे झाड कुणी पेरिले रक्तात
त्याच्या शपथांनी मला घर बांधिले लाटात ....

सावल्यांच्या शकुनांना अर्थ पालवीचा आला
टिळा अस्ताच्या शापाचा माझ्या भाळास लागला....

घर कोसळले,
त्याची जरा वेगळी कहाणी
पराभवांच्या डोळयांत उभे आयुष्याचे पाणी ....

## सैगल

मेंदूतील काळोखाच्या झाडांचे अरण्य सैगलच्या स्वरांसारखे
नग्न लाटांची घरे रक्तातून तरंगत निघालीत : ही प्रवासाची सुरुवात
आयुष्य उदंड फोफावले या शहराबरोबरच, रस्तेही
हातात गिटार घेऊन आले, त्यांनीच ही गाणी दिली
आणि स्वप्नांचे नाळ कापून नेले
तसा आजवर दु:खांना शरण गेलो कधी कोसळलोही
वादळांचे अमानुष हात गळा घोटण्याच्या तयारीने आल्यावर
माती खचत जावी तसे रक्त खचले; काळोखाचे पान पान गळत
दिवस मैलाच्या दगडांसारखे मागे पडत गेले आणि मी सारेच
विसरलो : माझे नाव, संदर्भ वगैरे
एक दिवस माझीच त्वचा सोलून मी अश्रूंचे झुंबर गाण्यातून
पेरले, सैगलच्या स्वरांची शपथ घेऊन.

होतो
उन्हाचा
आरसा

होतो उन्हाचा आरसा,
होते सावल्यांचे पाणी
दाट काळोखाइतुकी
खोल गाभुळली गाणी

उभा पोसला पाऊस
त्याची मनावर साय
आणि दुःखाचे पाखरू
खुल्या आकाशाशी जाय

तरी कोसळती तट
कधी मनाच्या मातीचे
घुमे रक्तात वादळ
कुण्या अज्ञात हाकेचे

होतो उन्हाचा आरसा
जुळे बिंबाशीच नाते
पूर सावल्यांचा : त्यात
घर वाहुनिया जाते....

## मोहेंजदारो

दूरवरून दरवळत येणारी गाण्याची एखादी ओळ
अचानक रक्त घेरून येते : सुरक्षित जपून ठेवलेल्या मनाचे
ढासळतात बुरूज, खोल मातीत गाडलेले एक मोहेंजदारो
हलकेच तरंगून वर येते...

या मातीत गाडलेले सारेच ओळखीचे : या माझ्या आठवणी
जखमी लाटांचे समुद्र आणि मेलेल्या पावलांनी त्याच त्याच
जुन्या वाटांतून भोवंडणारी तू.
म्हणालीस : गाण्यांच्या काळोखखोल गुहांतून
अरबी सुरस कथेतल्यासारखा अद्भुत प्रवास करून
मी पुन्हा तुझ्यापाशी आले आहे. मी म्हटले,
तसे ठीक आहे पण हल्ली एका खाऱ्या अश्रूसाठीही
निविदा फेरनिविदा मागवाव्या लागतात. काळ बराच उलटला आहे
अंधाराचे दडपण वाढत जाते
प्रत्येक देहाच्या तळाशी मातीत खोल गाडलेले
एक एक मोहेंजदारो तरंगून किनाऱ्यापर्यंत;
रक्त वाटांना शरण असते....

## तो

त्याने काहीतरी मागितले आणि तो निघून गेला
मी सर्वस्व दिले तरीही एक हातचा राहून गेला
वारा किलबिलत राहिला थकेपर्यंत पावलांचे पक्षी
मात्र मुकेमुके
अखेरीस मोठया शर्थीने आकाशाचा एक थेंब आयुष्याच्या चोचीत पडला ....
मध्येच तो भेटला. थांबला. त्याने विचारले " जगणे म्हणजे काय ? "
मी खाली मान घातली, तो हसत हसत गेला ....
अजून तो भेटतो कधी कधी अकस्मात.
होत्याचे नव्हते करून टाकतो
सगळे समजले आहे असे वाटतानाच काहीही समजलेले
नसते असे बजावूनही सांगतो
त्याने काहीतरी मागितले होते, काय ते नाही आठवत
मीही काहीतरी दिले होते तेव्हाच ना माझ्या
दु:खाला हा कंठ फुटला ....

कविता :
एका
घराच्या
मृत्यूची

१.

हा ढिगारा दिसतोय् ना ?
तिथे एक घर होते
दिसतात का तिथे कवितांच्या वह्या,
टेलिफोनचा रिसिव्हर, रमच्या फुटलेल्या बाटल्या ?
बरोबर, मग ते माझेच घर आहे.

२.

आठवतो ह्या घराच्या मृत्यूचा क्षण
तेव्हा लवलेशही नव्हता तिथे भीती-संकटांचा
घर हसरे होते
अचानक समुद्राची एक लाट भिंतीवर आदळली
तोच तो क्षण जेव्हा विरून गेले घराचे प्राण
लाटांच्या कोसळतेपणात
त्यानंतर ते असेच मृतावस्थेत उभे होते
सून्न रिकामे. मग कधीतरी कोसळले सपशेल
वसंताची वाट पाहून थकलेल्या
निष्पर्ण झाडासारखे
घर :
मनातील पहाटेच्या स्वप्नाचे....

३.

कधी एकदा हेच घर माझ्यापाशी आले होते
म्हणाले : ‘ मला एक घर हवे आहे. देशील का ? ’
मी म्हटले : ‘ आपण दोघे राहू बरोबरच. कधीतरी मी घर
बांधेन. ते तुला देईन. ’
घर माझ्या कविता वाचायचे जाहीर सभेत देखील
दुःख इतकेच—मी घराला माझे घर कधीही देऊ शकलो नाही.

४.

कुणीतरी प्रकाशावर फुंकर मारून
सर्वत्र काळोख करा रे
मला पहायचे नाहीत माझ्या असंख्य चुकांचे चेहरे
मला पहायचा नाही माझ्याकडे आसऱ्याला आलेल्या घराचा मृत्यू.
सर्वत्र काळोख करा
सर्वत्र आकाश भरून काळोख.
सर्व मृत घरांच्या निर्जीव केसांमधून
फिरत असतात काळोखाची कनवाळू बोटे
ज्यांच्या वाट्याला आले असेच आपल्या घरांचे
अनिवार्य मृत्यू, त्या साऱ्यांनी माझ्याबरोबर चला:
दुःखांसाठी वेगळी वसाहत आहे म्हणे
किमान तिथपर्यंत आपण पोचलेच पाहिजे.

२३२० २१९०१
REFBK-0021901
REFBK-0021901